श्री. राजू देवरावजी गुल्हाने, सरकारी कामगार अधिकारी, यवतमाळ यांचे पूर्वीच्या पदावरील वेतन संरक्षित करून त्यानूसार वेतनवाढी व वेतन यामधील फरक आदा करण्यास मंजूरी देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन आदेश क्र. वेनिती-२०१७/प्र.क्र.९५/कामगार-८
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १६ नोव्हेंबर, २०१७

पहा:- १) शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्र.नियुक्ती-२०११/प्र.क्र.११९/कामगार-८ दि.१९/९/२०११.
२) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.वेतन-१२८९/प्र.क्र.९०/सेवा-३ दि.२३/३/१९९४.
३) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.सेवाजो-२०१३/प्र.क्र.२९३/काम-८ दि.१०/३/२०१५.
४) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.परिवि-२०१४/प्र.क्र.३४२/१४/ काम-८ दि.०६/९/२०१७.

शासन आदेश:-

श्री.राजू देवरावजी गुल्हाने यांची सरकारी कामगार अधिकारी, गट-ब या पदावर दि.१९/९/२०११ च्या शासन निर्णयान्वये नामनिर्देशनाने (वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४००) नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार, श्री.राजू देवरावजी गुल्हाने हे दि.१/१०/२०११ (म.पू.) पासून सरकारी कामगार अधिकारी कार्यालय, यवतमाळ या कार्यालयात सरकारी कामगार अधिकारी या पदावर रूजू झाले. श्री.राजू देवरावजी गुल्हाने हे सदर पदावर रूजू होण्यापूर्वी व्यंकटेश विद्यालय, घोडखिंडी, यवतमाळ या शासन मान्य व अनुदानित संस्थेत सहायक शिक्षक/समुदेशक या पदावर दिनांक १७/७/१९९८ ते दिनांक ३०/९/२०११ पर्यन्त रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४०० या वेतनश्रेणीत कार्यरत होते. सदर वेतनश्रेणीत त्यांचे दि.३०/९/२०११ रोजी मूळ वेतन रु.१५८००/- इतके होते. श्री.राजू देवरावजी गुल्हाने यांची व्यंकटेश विद्यालय, घोडखिंडी जि.यवतमाळ येथील पूर्वीची सेवा निवृत्तीवेतन लाभासाठी सध्याच्या सरकारी कामगार अधिकारी पदाच्या सेवेस जोडून देण्यास शासन निर्णय दि.१०/३/२०१५ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

२. श्री.राजू देवरावजी गुल्हाने हे सेवा प्रवेश नियमात विहित केल्याप्रमाणे हिंदी परीक्षा उत्तीर्ण असल्याची अर्हता धारण करित नव्हते. त्यांना ही अर्हता धारण करण्यासाठी दि.२९/६/२०१५ पर्यंत वाढीव

कालावधी लागलेला आहे. त्यामुळे, त्यांचा सरकारी कामगार अधिकारी पदावरील परिविक्षाधिन कालावधी दि.२९/६/२०१५ पर्यंत वाढविण्यास व दि.३०/६/२०१५(म.नं) रोजी समाप्त करून त्यांची नियुक्ती पुढे चालू ठेवण्यास उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.०६/०९/२०१७ शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

३. श्री.राजू देवरावजी गुल्हाने, सरकारी कामगार अधिकारी यांचे महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११, नुसार व्यंकटेश विद्यालय, घोडखिंडी, यवतमाळ या शासन मान्य व अनुदानित संस्थेत सहायक शिक्षक या पदावरील दि.३०/९/२०११ रोजी रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४०० या वेतनश्रेणीत घेत असलेले मूळ वेतन रू.१५८००/- त्यांच्या नेमणूकीच्या दिनांकापासून म्हणजे दि.१/१०/२०११ पासून संरक्षित करून त्यानुसार सरकारी कामगार अधिकारी या पदावरील पुढील वेतनवाढी मुक्त करून व त्याप्रमाणे त्यांना देय होणा-या वेतन व भत्ते यामधील फरक आदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११६१५५८२४३०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gupte Sanju Kamlakar

Digitally signed by Gupte Sanju Kamlakar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2834863d93dd5ba34736e8845b6287c3dd58ee176cf2b893df4e169e70699c59, serialNumber=4c10e808fe85223e03be4cad0148cef9a71914878680c586fc438e7239dafca4, cn=Gupte Sanju Kamlakar
Date: 2017.11.16 16:06:04 +05'30'

(संजू क.गुप्ते)
शासनाचे अवर सचिव

प्रत-

१) प्रधान सचिव, (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) अपर कामगार आयुक्त,नागपूर
४) कामगार उप आयुक्त (प्रशासन), मुंबई
५) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र -२,नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी,यवतमाळ
७) श्री.राजू देवरावजी गुल्हाने,सरकारी कामगार अधिकारी,यवतमाळ द्वारा कामगार आयुक्त
८) निवडनस्ती (कामगार-८).